# दिवाणी अपील नं. ४२०/२०१२

(सी.एन.आर. नं.MHPU01-004561-2012)

श्रीमती सुभद्रा निवृत्ती पवार वगैरे
वि.
श्री. दिपक शिवराम पठारे

## नि. १८ वरील आदेश

सिटी कॉर्पोरेशन लिमीटेड/त्रयस्थ ईसम यांनी सदरचा अर्ज त्यांना ति—हाईत ईसम म्हणुन या अपीलमधे सामील करुन घ्यावे म्हणुन केला आहे.

२. अर्ज वाचला. यातील प्रतिवादींना नोटीस लागूनही कोणीही हजर झाले नाही, त्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्या जबाबाशिवाय चालविण्यात आला. अर्जदारांच्या वकीलांचे म्हणणे ऐकले.

३. श्रीमती अंजनाबाई ढमढेरे यांनी रेग्युलर दिवाणी मुकदमा नंबर ९४३/१९८७ व ११४१/१९८७ या दाव्यांमधे तिचा ३/५ हिस्सा आहे, असा वाटणीचा दावा केला होता. त्यानुसार दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, पुणे यांनी तो दावा अंजनाबाई हिच्या बाजुने दिला होता. त्यानंतर तो निकाल मा. सर्वोच्च न्यायालयापर्यंत कायम राहिला. श्रीमती अंजनाबाई हिने तिच्या हिस्सातील अर्धा हिस्सा म्हणजे ३/१० हिस्सा हा दिपक पठारे याला मृत्युपत्राने लिहुन दिले. त्यानंतर दिपक पठारे/जाबदेणार यांनी तो हिस्सा २२.११.२०१३ च्या खरेदीखताव्दारे यातील अर्जदार सिटी कार्पोरेशन लिमिटेड यांना विकला. अर्जदार हे या खरेदीखताच्या अनुषंगाने नावाची नोंद करण्यासाठी गेले असता, त्यांना असे समजले की, सुभद्राबाई पवार यांनी दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पुणे यांचेकडे रे.मु.नं. १५०७/२००९ या दाव्यात सदरचे मृत्युपत्र आव्हानित केले. तो दावा मा. न्यायालयाने फेटाळून लावला. त्या दाव्याच्या निकालाविरुध्द सदरचे अपील सुभद्राबाई हिने या न्यायालयात दाखल केले आहे.

४. दिनांक २२.०६.२०१६ रोजी प्रथमत: या ति—हाईत इसमास सदर अपील प्रलंबित असल्याचे माहित झाले. आता या मिळकतीचे मालक

अर्जदार हे झालेले आहेत. म्हणुन त्यांना या अपीलामधे सामील करुन घेणे आवश्यक आहे. म्हणुन खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अपीलार्थी यांना आदेश देण्यात येत आहे की, अर्जदार / त्रयस्थ ईसम सिटी कॉर्पोरेशन लिमीटेड यांना या अपिलात जाबदेणार म्हणुन सामील करुन घ्यावे.

स्वाक्षरीत/—

दिनांक : १३.०७.२०१८

( जी.पी.अग्रवाल )
जिल्हा न्यायाधीश—१७, पुणे.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Mrs. S.N.Kale |
| Name of Court | : | G.P.Agrawal, District Judge - 15, Pune. |
| Order delivered on | : | 13.07.2018 |
| Order signed on | : | 13.07.2018 |
| Order uploaded on | : | 10.08.2018 |